**<u>ठळक बातम्या</u>**

- एचएमपीव्ही संसर्गाबाबत घाबरू नये; मात्र खबरदारी घेण्याचं राज्य शासनाचं आवाहन

- राज्यातल्या वाहनांना एक एप्रिलपासून फास्ट टॅग बंधनकारक करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- वर्षाच्या सुरुवातीलाच वर्षभराचं शैक्षणिक वेळापत्रक तयार करण्याच्या राज्यपालांच्या विद्यापीठांना सूचना

- चालू आर्थिक वर्षासाठीत जीडीपी ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा सांख्यिकी मंत्रालयाचा अंदाज

**आणि**

- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार अमिताभ गुप्ता आणि नीलिम कुमार यांना जाहीर

**<><><><><>**

एचएमपीव्ही विषाणूमुळे होणारा आजार गंभीर नसून बरा होणारा आहे, त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. मात्र रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्यांची काळजी घ्यावी, असं आवाहन राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं आहे. मंत्रालयात एच एम पी व्ही विषाणूसंदर्भात आज झालेल्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. या आजारासंदर्भात माध्यमांनी योग्य माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी, असं आवाहन आबिटकर यांनी केलं. ते म्हणाले,

**होल्ड - आबिटकर बाइट**

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी यावेळी बोलतांना, राज्यात आतापर्यंत या संसर्गाचा एकही रुग्ण आढळलेला नाही, असं स्पष्ट केलं आहे. तरीही सर्व वैद्यकीय महाविद्यालयांनी औषधांसह ऑक्सिजन आणि आवश्यकता वाटल्यास विलगीकरण व्यवस्थेच्या तयारीत राहावं, आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द कराव्यात अशा सूचना मुश्रीफ यांनी दिल्या.

**<><><><><>**

राज्यातल्या चार चाकी वाहन धारकांना एक एप्रिल पासून फास्ट टॅग अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत ही बैठक झाली. १ एप्रिलपासून या निर्णयाची अंमलबजावणी होईल. फास्ट टॅग कार्यरत नसेल तर वाहन धारकाला पथकर शुल्काच्या दुप्पट शुल्क भरावे लागेल. त्याचप्रमाणे रोख रक्कम स्मार्ट कार्ड क्रेडिट डेबिट कार्ड किंवा कोड किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे पथकर शुल्क भरायचे असेल तरी देखील दुप्पट पथकर शुल्क भरावे लागेल. प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ आणि गतीमान करणारी सुधारित महाराष्ट्र शासन कार्यनियमावली प्रसिद्ध करायला मंत्रीमंडळानं आज मान्यता दिली. या सुधारणांमध्ये मंत्रिमंडळापुढे आणावयाची प्रकरणे, मुख्यमंत्री तसेच राज्यपाल यांच्या मान्यतेसाठी सादर करावयाची प्रकरणे, मंत्रिपरिषद आणि मंत्रिमंडळाची कार्यपद्धती आदी बाबींसंदर्भात तरतुदीचा समावेश आहे. १९७५ मध्ये पहिल्यांदा कार्यनियमावली तयार केल्यानंतर तिसऱ्यांदा अशी सुधारित कार्यनियमावली तयार केली आहे. राज्यात ‘ई कॅबीनेट’ आणि या बैठकीत होणारे निर्णय पोर्टलच्या माध्यमातून राज्यातील जनतेला उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येणारा प्रस्ताव ऑनलाईन अपलोड करणे, तो मंत्रिमंडळासमोर चर्चेसाठी आणि निर्णयासाठी सादर करणे, त्यावर अंतिम निर्णय

आणि त्याबाबतच्या सर्व नोंदी ठेवणे, ही सर्व प्रक्रिया ई-कॅबिनेटमुळे सहजरित्या पार पडेल.

<><><><>

सामान्य नागरिकांचं दैनंदिन जीवन सुकर व्हावं यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज राज्यातल्या सर्व अधिकाऱ्यांना सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला. त्यांनी आज सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला. यावेळी त्यांनी येत्या शंभर दिवसांत प्राधान्यानं करायच्या कामांबाबत सविस्तर सूचना प्रशासनाला दिल्या. त्यावरच्या कार्यवाहीचा आढावा येत्या १५ एप्रिलला घेतला जाईल, असं त्यांनी सांगितलं.

विभाग, कार्यालयाचं संकेतस्थळ अद्ययावत करा, ईज ऑफ लिव्हिंग संकल्पनेवर काम करा, शासकीय कार्यालयात स्वच्छता मोहिम राबवा, नागरिकांच्या तक्रारी, प्रलंबित प्रकरणं निकाली काढा, उद्योजकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या, शासनाच्या महत्वाच्या प्रकल्प आणि योजनांच्या प्रकल्पांना भेटी द्या, शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून द्या, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

<><><><>

सर्व विद्यापीठांनी वर्षाच्या सुरुवातीलाच वर्षभराचं शैक्षणिक वेळापत्रक तयार करावं. ते विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावं आणि त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी विद्यापीठांना केल्या आहेत. जून महिन्यापर्यंत निकाल जाहीर करून एका महिन्यात दीक्षांत समारोह आयोजित करावेत जेणेकरून विद्यार्थ्यांना लगेच पदवी मिळेल असंही त्यांनी सांगितलं.

मुंबई विद्यापीठाच्या वार्षिक दीक्षांत समारंभात ते आज बोलत होते. यावेळी १ लाख ६४ हजार ४६५ विद्यार्थ्यांना पदवी तर ४०१ विद्यार्थ्यांना पीएच.डी. आणि १८ विद्यार्थ्यांना सुवर्णपदके प्रदान करण्यात आली. यावेळी अनेक मान्यवर, अधिकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकांची निवड गुणवत्तेवर करण्यासाठी पारदर्शक यंत्रणा निर्माण करण्याची गरज राज्यपालांनी व्यक्त केली.

<><><><><>

मुंबई महानगर क्षेत्रात रोप वे च्या माध्यमातून केबल कार प्रकल्प राबवायला केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी तत्वतः मान्यता दिली आहे. लवकरच या प्रकल्पाचं सर्वेक्षण करून विकास आराखडा तयार केला जाईल. तसे निर्देश गडकरी यांनी रस्ते वाहतूक मंत्रालयाचे सचिव  वी. उमाशंकर यांना दिले आहेत. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली.

<><><><><>

भारताचा २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठीचा जीडीपी अर्थात, स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के असेल, असा प्राथमिक अंदाज सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं व्यक्त केला आहे. या मंत्रालयाच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयानं आज याबाबतची आकडेवारी प्रसिद्ध केली. त्यानुसार एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पादनात ९ पूर्णांक ७ दशांश टक्के वाढ दिसून आली आहे. तर प्रत्यक्ष स्थूल मूल्यवर्धित वाढ ६ पूर्णांक ४ दशांश टक्के दिसून आली आहे.

कृषी आणि संबंधित क्षेत्रांमधली ही वाढ ३ पूर्णांक ८ दशांश टक्के झाली आहे. बांधकाम क्षेत्र तसंच वित्तीय, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा क्षेत्रातही चांगली वाढ अपेक्षित आहे. बांधकाम क्षेत्रात ही वाढ ८ पूर्णांक ६ दशांश

टक्के, तर वित्तीय, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा क्षेत्रांसाठी ही वाढ ७ पूर्णांक ३ दशांश टक्के असेल असा अंदाज यात व्यक्त केला आहे.

<><><><><>

नाशिक इथल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे दिल्या जाणाऱ्या कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली. त्यात २०२२ चा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना, तर २०२३ चा पुरस्कार आघाडीचे आसामी कवी नीलिम कुमार यांना जाहीर झाला आहे.

रोख एक लाख रुपये, मानपत्र आणि मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

अमिताभ गुप्ता हे १९६५ पासून कविता लिहीत असून त्यांचे आतापर्यंत २० हून अधिक कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. बंगालीतील लघुनियतकालिकांच्या आंदोलनातून काव्यलेखनाचा आरंभ करणारे अमिताभ गुप्ता नंतर समकालीन बंगाली कवितेच्या मध्यवर्ती प्रवाहातील लक्षणीय कवी म्हणून गणले जाऊ लागले. तर आसामी कवी नीलिम कुमार यांचे एकूण २४ कवितासंग्रह प्रकाशित असून त्यांच्या इंग्रजी अनुवादाचे तीन संग्रह, हिंदी अनुवादाचे तीन आणि पंजाबी अनुवादाचा एक संग्रह प्रकाशित झाला आहे. फ्रेंच, स्पॅनिश आणि मराठीसह अनेक भारतीय भाषांमधे त्यांच्या कवितांचे अनुवाद प्रसिद्ध आहेत.

<><><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज रेल्वे भवन इथं केंद्र सरकारच्या अधिकृत दिनदर्शिकेचं अनावरण केलं. यंदाच्या दिनदर्शिकेची संकल्पना 'जनभागीदारी से जन कल्याण' अशी आहे. 'सबका साथ, सबका विकास' या सरकारच्या ब्रीदवाक्याशी ही दिनदर्शिका सुसंगत असल्याचं वैष्णव म्हणाले.

<><><><><>

भारतीय जनता पक्षाने दीड कोटी प्राथमिक सदस्य आणि ५ लाख सक्रीय सदस्यांचं लक्ष्य ठेवल्याची माहिती भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. मुंबईत आज ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. १० जानेवारी रोजी सुरू होणाऱ्या घर चलो अभियानामुळे सदस्यता नोंदणीला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. १२ जानेवारी रोजी अहिल्यानगर इथं होणाऱ्या पक्षाच्या कार्यकारिणीच्या बैठकीसाठी जवळपास १५ हजार कार्यकर्ते येणार असून या कार्यक्रमाच्या उद्घाटनाला केंद्रीय मंत्री अमित शहा, तर समारोपाच्या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा उपस्थित राहणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यातल्या एटापल्ली तालुक्यात सुरजागड इथल्या ठाकूरदेव यात्रेत आसपासच्या ७० गावातल्या  नागरिकांनी जल, जंगल आणि जमिनीचे संवर्धन करण्याचा संकल्प सोडला. दरवर्षी ५ ते ७ जानेवारी असे तीन दिवस ही यात्रा भरते.

<><><><><>

नाशिक जिल्हा महिला सहकारी बॅंकेच्या माजी अध्यक्ष, आणि सहकार भारतीच्या माजी प्रदेशाध्यक्ष डॉ. शशी आहिरे याचं आज सकाळी नाशिकमध्ये निधन झाले. त्या ७६ वर्षांच्या होत्या.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली. तर कोकणात तुरळक ठिकाणी किंचित घट झाली.

सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं ८ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**